# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

# आई-वडिलांची सेवाच खरी ईश्वरसेवा

## निवृत्ती महाराज देशमुख : राजगुरूनगर येथे 'मायबाप' कार्यक्रम

राजगुरुनगर, दि. २ (प्रतिनिधी) - आई-वडिलांच्या गालावरचे हसू हे मुलांसाठीची सर्वात मोठी श्रीमंती आहे. आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे प्रतिपादन समाजप्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज देशमुख यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'मायबाप' या विषयावर देशमुख बोलत होते. याप्रसंगी माजी आमदार विलास लांडे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, जिल्हा परिषद सदस्य बाबाजी काळे, संस्था संचालक अ‍ॅड. मुकुंद आवटे, व्याख्यानमाला समितीच्या अध्यक्षा अ‍ॅड. राजमाला बुट्टेपाटील, अ‍ॅड.माणिक पाटोळे यांच्यासह सुमारे सात हजार विद्यार्थी आणि तीन हजार ग्रामस्थ उपस्थित होते.



राजगुरूनगर : साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'मायबाप' या कार्यक्रमात उपस्थित मान्यवर. इन्सेटमध्ये निवृत्ती महाराज देशमुख.

निवृत्ती महाराज देशमुख म्हणाले की, कुटुंब व्यवस्था विचाराने कमजोर झाल्याने समाज विकासापासून वंचित राहत आहे. त्यासाठी सदविचारांना आजही समाजात किंमत आहे. सकारात्मक विचारांनी काम केले तर आदर्श नागरिक बनण्याची कुवत या सदविचारांमध्ये आहे. पालकांनीही आपल्या घरात मुलांना अभ्यासपूरक वातावरण निर्माण करून दिले पाहिजे तरच मुले घडतील.

समाजात ज्ञानाला किंमत असून ज्यांच्याकडे गुणवत्ता आहे त्यांना आजही नोकऱ्या असल्याचे ते म्हणाले. विद्यार्थी हा वर्गात किंवा क्रीडांगणावर असायला हवा. विद्यार्थी सर्वगुणसंपन्न तयार व्हावा यासाठी महाविद्यालय हे उर्जा निर्माण करणारे स्रोत असायला हवे. विद्यार्थ्यांना कष्ट, सदविचार, चांगले मित्र, अखंडाभ्यास या गोष्टी मोठे होण्यासाठी आवश्यक आहेत. अपयशाने खचून जाऊ नका. मुलांनी आई-वडिलांचा संभाळ करावा. प्रेरणादायी चरित्र पाठ करून आचरणात आणावे. व्यसनांच्या आहारी जाऊ नये. आणि योग्य शिक्षण व कष्ट करण्याची सवय अंगीकारून वर्तमान आयुष्य चांगले जगण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अनिल कुलकर्णी यांनी केले.पाहुण्यांचा परिचय प्रा.धनंजय बोन्हाडे यांनी तर आभार प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील यांनी मानले.

### मोबाईलचा अतिरेक नको

मोबाईल ही गरज असली तरी त्याचा अतिरेक करू नये. मोबाईलच्या अतिरेकाने माणसामाणसातील संवाद संपत चालला आहे. निद्रानाशासारखा आजार जडला आहे. शालेय जीवनातील मुलांचे मोबाईल पालकांनी वेळोवेळी तपासायची गरज आहे.

# आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : आई-वडिलांच्या गालावरचे हसू हे मुलांसाठीची सर्वांत मोठी श्रीमंती असून, आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे प्रतिपादन समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्तीमहाराज देशमुख यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'मायबाप' या विषयावर बोलत होते. निवृत्तीमहाराज देशमुख व्याख्यानात म्हणाले, "कुटुंबव्यवस्था विचाराने कमजोर झाल्याने समाजविकासापासून वंचित राहत आहे. त्यासाठी सद्विचारांना आजही समाजात किंमत आहे. सकारात्मक विचारांनी काम केले तर आदर्श नागरिक बनण्याची कुवत या सद्विचारांमध्ये आहे. पालकांनीही आपल्या घरात मुलांना अभ्यासपूरक वातावरण निर्माण करून दिले पाहिजे तरच मुले घडतील."

राजगुरुनगर ही क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरुंची भूमी असून या क्रांतीच्या भूमीत शिक्षणाची ज्ञानज्योत साहेबरावजी बुट्टे-पाटील यांनी लावली.

या महाविद्यालयातील विद्यार्थी आदर्श घडला तरच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे ते म्हणाले.

- मोबाईल ही गरज असली तरी त्याचा अतिरेक करू नये. मोबाईलच्या अतिरेकाने माणसा-माणसांतील संवाद संपत चालला आहे. निद्रानाशासारखा आजार जडला आहे.
- शालेय जीवनातील मुलांचे मोबाईल पालकांनी वेळोवेळी तपासायची गरज व्यक्त केली. विद्यार्थी वर्गात किंवा क्रीडांगणावर असायला हवा. विद्यार्थी सर्वगुणसंपन्न तयार व्हावा, यासाठी महाविद्यालय हे ऊर्जा निर्माण करणारे स्रोत असायला हवेत.
- विद्यार्थ्यांना कष्ट, सद्विचार, चांगले मित्र, अखंडाभ्यास या गोष्टी मोठे होण्यासाठी आवश्यक आहेत. अपयशाने खचून जाऊ नका. आपले काम प्रामाणिकपणे करा.

# आईवडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा

## राजगुरुनगर येथे निवृत्ती महाराज देशमुख यांचे प्रतिपादन

**राजगुरुनगर, ता. ३ :** कुटुंबव्यवस्था कमजोर झाल्याने व्यक्ती दुबळ्या होतात आणि प्रगतीला खीळ बसते. त्यामुळे कुटुंब भक्कम ठेवावे. त्यासाठी आईवडिलांचे स्थान वंदनीय पाहिजे. मुलांनी आईवडिलांचा सांभाळ करावा. आईवडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे, असे प्रतिपादन समाजप्रबोधनकार हभप निवृत्तिमहाराज देशमुख यांनी केले.

साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेचे शेवटचे पुष्प गुंफताना 'मायबाप' या विषयावर ते बोलत होते. देशमुख म्हणाले, की आदर्श नागरिक बनण्याची कुवत सदविचारांमध्ये आहे. त्यासाठी पालकांनी आपल्या घरात मुलांना अभ्यासपूरक वातावरण निर्माण करून दिले पाहिजे. त्याला चांगल्या विचारांकडे जाण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. विद्यार्थिदशेतील मुलांचे



**निवृत्ती महाराज**

मोबाईल पालकांनी वेळोवेळी तपासायची गरज आहे. मोबाईल ही गरज असली, तरी त्याचा अतिरेक करू नये. मोबाईलच्या अतिरेकाने माणसा माणसांतील संवाद संपत चालला आहे.

विद्यार्थी हा वर्गात किंवा क्रीडांगणावर असायला हवा. चांगले मित्र, अभ्यास या गोष्टी मोठे होण्यासाठी आवश्यक आहेत. व्यसनांच्या आहारी जाऊ नका. अपयशाने खचून जाऊ नका. आपले काम प्रामाणिकपणे करा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. अनिल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी आभार मानले.

# आईवडिलांची सेवा हीच ईश्वरसेवा : देशमुख

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

आईवडिलांच्या गालावरचे हसू हे मुलांसाठीची सर्वात मोठी श्रीमंती असून आईवडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे प्रतिपादन समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'मायबाप' या विषयावर ते बोलत होते. माजी आमदार विलास लांडे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष



राजगुरू महाविद्यालयात व्याख्यानास उपस्थित नागरिक.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, जि.प.सदस्य बाबाजी काळे, संस्था संचालक ॲड.मुकुंदराव आवटे, बाळासाहेब सांडभोर, सुशील सिंगवी, डॉ. रोहिणी राक्षे, अश्विनी मोरमारे, ॲड. राजमाला बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

देशमुख म्हणाले की, क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरुंची भूमी असून या क्रांतीच्या भूमीत शिक्षणाची ज्ञानज्योत साहेबरावजी बुट्टेपाटील यांनी लावली. या महाविद्यालयातील विद्यार्थी आदर्श घडला तरचं त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल.

---

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

# आईवडिलांची सेवा हीच ईश्वरसेवा

राजगुरुनगर : आईवडिलांच्या गालावरचे हसू हे मुलांसाठीची सर्वात मोठी श्रीमंती असून आईवडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे प्रतिपादन समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांनी केले ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत मायबाप याविषयावर बोलत होते.

या प्रसंगी माजी आमदार विलास लांडे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, जि.प.सदस्य बाबाजी काळे, संस्था संचालक ॲड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, डॉ.रोहिणी राक्षे, अश्विनी मोरमारे, ॲड.माणिक पाटोळे, उमेश आगरकर, व्याख्यानमाला समितीच्या अध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते. निवृत्ती महाराज देशमुख यांचे स्वागत ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.



निवृत्ती महाराज देशमुख पुढे म्हणाले की, कुटुंब व्यवस्था विचाराने कमजोर झाल्याने समाज विकासापासून वंचित राहत आहे. त्यासाठी सदविचारांना आजही समाजात किंमत आहे. सकारात्मक विचारांनी काम केले तर आदर्श नागरिक बनण्याची कुवत या सदविचारांमध्ये आहे. पालकांनीही आपल्या घरात मुलांना अभ्यासपूरक वातावरण निर्माण करून दिले पाहिजे तरच मुले घडतील. ते पुढे म्हणाले की मोबाईल ही गरज असली तरी त्याचा अतिरेक करू नये. मोबाईलच्या अतिरेकाने माणसामाणसातील संवाद संपत चालला आहे. निद्रानाशासारखा आजार जडला आहे. शालेय जीवनातील मुलांचे मोबाईल पालकांनी वेळोवेळी तपासायची गरज व्यक्त केली. समाजात ज्ञानाला किंमत असून ज्यांच्याकडे गुणवत्ता आहे त्यांना आजही नोकऱ्या असल्याचे ते म्हणाले. विद्यार्थी हा वर्गात किंवा क्रीडांगनावर असायला हवा. विद्यार्थी सर्वगुणसंपन्न तयार व्हावा यासाठी महाविद्यालय हे उर्जा निर्माण करणारे स्रोत असायला हवे. विद्यार्थ्यांना कष्ट, सदविचार, चांगले मित्र, अखंडाभ्यास या गोष्टी मोठे होण्यासाठी आवश्यक आहेत. अपयशाने खचून जाऊ नका. आपले काम प्रामाणिकपणे करा असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

राजगुरुनगर ही क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरुंची भूमी असून या क्रांतीच्या भूमीत शिक्षणाची ज्ञानज्योत साहेबरावजी बुट्टेपाटील यांनी लावली. या महाविद्यालयातील विद्यार्थी आदर्श घडला तरचं त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल असे ते म्हणाले. मुलांनी आईवडिलांचा संभाळ करावा. प्रेरणादायी चरित्र पाठ करून आचरणात आणावे. व्यसनांच्या आहारी जाऊ नये. आणि योग्य शिक्षण व कष्ट करण्याची सवय अंगीकारून वर्तमान आयुष्य चांगले जगण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनीही त्यांना आवाहनास प्रचंड टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अनिल कुलकर्णी यांनी केले.पाहुण्यांचा परिचय प्रा.धनंजय बोऱ्हाडे यांनी तर आभार प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील यांनी मानले.

लोकमत पुणे, रविवार, दि. ३ फेब्रुवारी २०१९

# आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : आई-वडिलांच्या गालावरचे हसू हे मुलांसाठीची सर्वांत मोठी श्रीमंती असून, आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे प्रतिपादन समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्तीमहाराज देशमुख यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'मायबाप' या विषयावर बोलत होते. निवृत्तीमहाराज देशमुख व्याख्यानात म्हणाले, "कुटुंबव्यवस्था विचाराने कमजोर झाल्याने समाजविकासापासून वंचित राहत आहे. त्यासाठी सद्विचारांना आजही समाजात किंमत आहे. सकारात्मक विचारांनी काम केले तर आदर्श नागरिक बनण्याची कुवत या सद्विचारांमध्ये आहे. पालकांनीही आपल्या घरात मुलांना अभ्यासपूरक वातावरण निर्माण करून दिले पाहिजे तरच मुले घडतील."

राजगुरुनगर ही क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरूंची भूमी असून या क्रांतीच्या भूमीत शिक्षणाची ज्ञानज्योत साहेबरावजी बुट्टे-पाटील यांनी लावली.

या महाविद्यालयातील विद्यार्थी आदर्श घडला तरच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे ते म्हणाले.

- मोबाईल ही गरज असली तरी त्याचा अतिरेक करू नये. मोबाईलच्या अतिरेकाने माणसा-माणसांतील संवाद संपत चालला आहे. निद्रानाशासारखा आजार जडला आहे.
- शालेय जीवनातील मुलांचे मोबाईल पालकांनी वेळोवेळी तपासायची गरज व्यक्त केली. विद्यार्थी वर्गात किंवा क्रीडांगणावर असायला हवा. विद्यार्थी सर्वगुणसंपन्न तयार व्हावा, यासाठी महाविद्यालय हे ऊर्जा निर्माण करणारे स्रोत असायला हवेत.
- विद्यार्थ्यांना कष्ट, सद्विचार, चांगले मित्र, अखंडाभ्यास या गोष्टी मोठे होण्यासाठी आवश्यक आहेत. अपयशाने खचून जाऊ नका. आपले काम प्रामाणिकपणे करा.

पुण्य नगरी

बुधवार
६ मार्च २०१९
पुणे

# आईवडिलांची सेवा हीच ईश्वरसेवा : निवृत्ती महाराज देशमुख

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** आईवडिलांच्या गालावरचे हसू हे मुलांसाठीची सर्वात मोठी श्रीमंती असून आईवडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे प्रतिपादन समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांनी केले ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत मायबाप याविषयावर बोलत होते.

या प्रसंगी माजी आमदार विलास लांडे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, जि.प.सदस्य बाबाजी काळे, संस्था संचालक ॲड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, डॉ.रोहिणी राक्षे, अश्विनी मोरमारे, ॲड.माणिक पाटोळे, उमेश आगरकर, व्याख्यानमाला समितीच्या अध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे तसेच ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते. निवृत्ती महाराज देशमुख यांचे स्वागत ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

निवृत्ती महाराज देशमुख पुढे म्हणाले की, कुटुंब व्यवस्था विचाराने कमजोर झाल्याने समाज विकासापासून वंचित राहत आहे. त्यासाठी सदविचारांना आजही समाजात किंमत आहे. सकारात्मक विचारांनी काम केले तर आदर्श नागरिक बनण्याची कुवत या सदविचारांमध्ये आहे.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख